1462473/2024/O/O JT-DIR-ROPUNE

I/276458/2024

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्रमांक : तंशिविकापु/विवि/युनिसेफ/ई-ऑफीस प्रणालीद्वारे    दिनांक : १६.०२.२०२४

**तातडीचे परिपत्रक: (कालमर्यादा २९.०२.२०२४)**

प्रति,
प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित
पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम AISHE अंतर्गत नोंदणी करणे व DCF III माहिती अपलोड करणेबाबत..**

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. DTEM-D30IT/4/2024-DESK3 दिनांक १३.०२.२०२४.

उच्च शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे द्वारे अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम राबवण्यात येतो. हा सर्वेक्षण कार्यक्रम ऑनलाईन असून सर्व संस्थांनी सर्वेक्षणाची माहिती https://aishe.gov.in या पोर्टलवर भरणे अनिवार्य आहे. सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था ज्या विद्यापीठाशी संस्था सलग्नित आहेत अश्या विद्यापीठाद्वारे सर्वेक्षणाचे काम पाहिले जाते व तंत्र शिक्षण संचालनालया अंतर्गत येणा-या पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था करिता तंत्रशिक्षण संचालनालय मार्फत पर्यवेक्षण करण्यात येते.

दिनांक ०५.०१.२०२४ रोजी पोर्टल वर माहिती गोळा करणे बाबत सुरवात झालेली आहे, अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम AISHE २०२२-२३ अंतर्गत नोंदणी व DCF III मध्ये माहिती भरून अपलोड करण्याचे काम दिनांक २९.०२.२०२४ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. त्या अनुषंगाने संस्थांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१. या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीत येणा-या पदविका (नवीन/जुन्या) संस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम अंतर्गत नोंदणी व DCF ची अचूक माहिती दिनांक २९.०२.२०२४ पर्यंत अपलोड करावी.
२. सर्व पदविका संस्थांनी अचूक माहिती अपलोड झाल्याबाबत प्रमाणपत्र जमा करुन घ्यावे व त्याची एक प्रत उच्च शिक्षण संचालनालयास stat.dhepune@nic.in या ईमेल वर पाठवून त्याची एक प्रत सोबत दिलेल्या गुगल फॉर्मवर अपलोड करावी.
३. AISHE पोर्टलवर नोंदणी न केल्यामुळे संस्थांना, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती किंवा इतर लाभापासून वंचित रहावे लागल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

Signed by Maruti Rajaram Jadhav
Date: 16-02-2024 18:15:54
Reason: Approved
(मा. र. जाधव)
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई (कार्यासन क्रमांक ३)